सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## विधि व न्याय विभाग

# सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ५

## महाराष्ट्र बँकांकडून कृषिविषयक कर्जाच्या सोयीची तरतूद करण्याबाबत अधिनियम, १९७४

( दिनांक १९ सप्टेंबर २०११ पर्यंत सुधारलेला )

# Maharashtra Act No. V of 1975

## The Maharashtra Provision of Facilities for Agricultural Credit by Banks Act, 1974

(As modified upto 19th Sept. 2011)

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, वाई (जिल्हा-सातारा) यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक,
शासन मुद्रण व लेखनसामग्री, संचालनालय महाराष्ट्र शासन, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.

१९८४

[ किंमत ९.०० रुपये ]

# महाराष्ट्र बँकांकडून कृषिविषयक कर्जाच्या सोयीची तरतूद करण्याबाबत अधिनियम, १९७४

## अनुक्रमणिका

उद्देशिका —

कलमे

### प्रकरण १


प्रारंभिक पृष्ठ

१. संक्षिप्त नाव, व्याप्ति व प्रारंभ ... ... ... ... ... १

२. व्याख्या ... ... ... ... ... १


### प्रकरण दोन

### जमीन किंवा तीमधील हितसंबंध यांचे बँकांच्या नावे अन्य संक्रामण करण्याचे शेतकऱ्यांचे अधिकार.


३. अन्य संक्रामणावरील निर्बंध काढून टाकणे. ... ... ... ... ३

४. पीक आणि इतर जंगम मालमत्ता यावर बँकेच्या नावाने भार निर्माण करणे. ... ३

५. बँकेच्या नावे, प्रतिज्ञापत्राद्वारे, जमिनीवर भार निर्माण करणे. ... ... ... ३


### प्रकरण तीन

### बँकांच्या नावे भार निर्माण करणे व गहाण ठेवणे आणि त्यांचे प्राथम्य


६. भार व गहाण निर्माण करण्यामधील असमर्थता दूर करणे. ... ... ... ४

७. बँकेच्या, शासनाच्या व सहकारी संस्थेच्या नावे असणाऱ्या भारांचे व गहाणांचे प्राथम्य. ४

८. बँकेच्या नावे भाराची किंवा गहाणांची नोंदणी. ... ... ... ... ५

९. बँकेच्या नावे निर्माण केलेल्या भाराची किंवा गहाणाची अधिकार अभिलेखात नोंद करणे. ५

१०. कर्जदार शेतकऱ्यांकडून करण्यात येणाऱ्या कूळवहिवाट निर्मितीवर निर्बंध. ... ... ५


### प्रकरण चार

### बँकांच्या देय रकमांच्या वसुलीची व्यवस्था


११. विहित प्राधिकाऱ्यामार्फत बँकांना देय असलेल्या रकमांची वसुली. ... ... ६

१२. स्थावर मालमत्ता संपादन करण्याचे आणि तिचा विनियोग करण्याचे बँकेचे हक्क. ... ६

१३. कमाल मर्यादेपेक्षा अधिक जमिनीच्या संपादनावरील निर्बंधापासून बँकांना सूट. ... ७

## प्रकरण पाच

## बँकांनी सहकारी संस्थांना भांडवल पुरविणे

पृष्ठ

१४. बँक सहकारी संस्थेची सदस्य होण्यास पात्र असणे. ... ... ... ७

१५. सहकारी संस्थेच्या पुस्तकांची बँकेकडून तपासणी. ... ... ... ७

१६. बँक आणि सहकारी संस्था यांच्यामधील विवाद. ... ... ... ७

१७. विवादांचा निर्णय. ... ... ... ... ... ७

१८. निवाडा देण्यात आलेल्या पैशाची वसुली. ... ... ... ... ८

१९. सहकारी संस्थांच्या कसूरदार सदस्यांविरुद्ध कार्यवाही. ... ... ... ८

२०. संस्थेची लेखापरीक्षा चौकशी आणि तपासणी अहवाल बँकांना उपलब्ध असणे. ... ८

## प्रकरण सहा

## किरकोळ

२१. सावकारी आणि शेतीविषयक कर्जबाजारीपणामध्ये सहाय्य यासंबंधीच्या कायद्यापासून सूट. ... ... ... ... ... ८

२२. अविभक्त हिंदू कुटुंबाच्या व्यवस्थापकांनी करून दिलेले गहाणखत. ... ... ९

२३. सन १९५६ चा अधिनियम बत्तीस याचे कलम ८, त्यात फेरबदल करून लागू करणे. ... ... ... ... ... ... ९

२४. गहाणकारांच्या नादारीनंतर गहाणखतावर आक्षेप घेण्यात येणार नाही. ... ... ९

२५. राज्य शासनाचा नियम करण्याचा अधिकार. ... ... ... ... ९

अनुसूची. ... ... ... ... ... ... १०

# MAHARASHTRA ACT No. V. OF 1975

AN ACT TO MAKE BETTER PROVISION FOR THE ADEQUATE SUPPLY OF CREDIT FOR INCREASING AGRICULTURAL PRODUCTION AND DEVELOPMENT IN THE STATE; AND FOR THAT PURPOSE TO REMOVE ANY RESTRICTIONS ON ALIENATIONS OF CERTAIN AGRICULTURAL LANDS, SO THAT BANKS MAY PROVIDE CREDIT ON SUCH AGRICULTURAL LANDS; TO PROVIDE FOR THE SPEEDY RECOVERY OF THE DUES OF SUCH BANKS WHICH PROVIDE CREDIT; AND TO PROVIDE FOR MATTER CORRECTED WITH AND INCIDENTAL TO THE PURPOSES AFORESAID.

[ राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात,** दिनांक १० मार्च १९७५ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेले ]

## सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५.

**राज्यातील कृषि उत्पादन व विकास यांच्या वाढीसाठी पुरेसा कर्जपुरवठा करण्यासाठी अधिक चांगली तरतूद करणे; आणि या प्रयोजनासाठी, विवक्षित शेतजमिनींच्या अन्यसंक्रामणावरील कोणतेही निर्बंध, बँकांना अशा शेतजमिनींवर कर्जाची तरतूद करता यावी म्हणून, काढून टाकणे; कर्जाची तरतूद करणाऱ्या अशा बँकांच्या थकबाक्यांची वसुली जलद होण्याकरिता तरतूद करणे; आणि पूर्वोक्त प्रयोजनांशी संबंधित व आनुषंगिक अशा बाबींसाठी तरतूद करणे यांसाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्यातील कृषि उत्पादन व विकास यांच्या वाढीसाठी पुरेसा कर्जपुरवठा करण्यासाठी अधिक चांगली तरतूद करणे; आणि त्या प्रयोजनासाठी, विवक्षित शेतजमिनींच्या अन्य संक्रामणावरील कोणतेही निर्बंध, बँकांना अशा शेतजमिनीवर कर्जाची तरतूद करता यावी म्हणून, काढून टाकणे; कर्जाची तरतूद करणाऱ्या अशा बँकांच्या थकबाक्यांची वसुली जलद होण्याकरिता तरतूद करणे; आणि पूर्वोक्त प्रयोजनांशी संबंधित व आनुषंगिक अशा बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

### प्रकरण एक

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र बँकांकडून कृषिविषयक कर्जाच्या सोयीची तरतूद करण्याबाबत अधिनियम, १९७४ असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ति व प्रारंभ

(२) तो, सबंध महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

(३) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमील अशा तारखेपासून अंमलात येईल.

२. या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, — व्याख्या.

(अ) "कृषि" किंवा "कृषिविषयक प्रयोजन" या संज्ञेमध्ये, जमीन लागवडीयोग्य करणे, जमीन कसणे, जलसिंचनाच्या मार्गांचा विकास करणे यांसह, जमिनीची सुधारणा करणे, पिके काढणे व कापणे, उद्यानविद्या, वनरोपण, रोप लावणी आणि शेती आणि गुराढोरांची पैदास, पशुसंवर्धन, दुग्धशाळा उद्योग, बी बियाणे उद्योग, मासे वाढविणे, मधमाशा पाळणे, रेशीम उत्पादन, डुकरे पाळणे, कोंबड्या पाळण्याचा धंदा करणारे आणि शेतकरी, दुग्धशाळा व्यवसायी, गुराढोरांची पैदास करणारे, कोंबड्या पाळणारे व कृषि उत्पादनांची खरेदीविक्री, त्यांचे साठवण व वाहतूक यांसह तत्सम कामे करणाऱ्या व्यक्तींचे इतर प्रवर्ग यांच्याकडून, सर्वसाधारणतः पार पाडली जाणारी अशी इतर कामे करणे आणि अशा कोणत्याही कामाच्या संबंधात अवजारे व यंत्रसामग्री यांचे संपादन करणे यांचा तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० याच्या कलम १११ मध्ये नमूद केलेल्या प्रयोजनांचा अंतर्भाव होतो;

(ब) "शेतकरी" म्हणजे, शेती कामात गुंतलेली व्यक्ती;

(क) "कृषि उद्योग महामंडळ" म्हणजे, कृषि विकासाशी संबंधित किंवा कृषि विकासाचा हेतू असणारी कामे हाती घेणे हा एक प्रमुख उद्देश असणारी व जिच्या भरणा केलेल्या भाग भांडवलापैकी कमीत कमी एकावन्न टक्के रक्कम केंद्र सरकारने किंवा कोणत्याही राज्य शासनाने किंवा शासनांनी किंवा अंशतः केंद्र सरकारने व अंशतः एक किंवा अधिक राज्य शासनाने किंवा शासनांनी धारण केलेली आहे अशी, कंपनी किंवा इतर निगम निकाय;

(ड) "बँक" म्हणजे, —

(एक) बँक व्यवसायाचे नियमन करण्याबाबत अधिनियम, १९४९ यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे बँक व्यवसाय करणारी कंपनी; १९४९ चा दहा

(दोन) स्टेट बँक ऑफ इंडिया अधिनियम, १९५५ अन्वये रचना करण्यात आलेली स्टेट बँक ऑफ इंडिया; १९५५ चा २३

(तीन) स्टेट बँक ऑफ इंडिया (दुय्यम बँक) अधिनियम, १९५९ यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे दुय्यम बँक; १९५९ चा ३८

(चार) बँक व्यवसाय (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९७० अन्वये रचना करण्यात आलेली तत्सम नवीन बँक; १९७० चा ५

(पाच) बँक व्यवसाय नियमन अधिनियम, १९४९ याच्या कलम ५१ अन्वये केंद्र सरकारने अधिसूचित केलेली कोणतीही बँक व्यवसाय करणारी संस्था; १९४९ चा दहा

(सहा) कृषि पुनर्वित्तव्यवस्था महामंडळ अधिनियम, १९६३ अन्वये रचना करण्यात आलेले कृषि पुनर्वित्तव्यवस्था महामंडळ; १९६३ चा दहा

(सात) कोणतेही कृषि उद्योग महामंडळ;

(आठ) कंपनी अधिनियम, १९५६ या कायद्याने संस्थापित कृषि वित्तव्यवस्था महामंडळ, मर्यादित; किंवा १९५६ चा एक

(नऊ) या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी राज्य शासनाने **शासकीय राजपत्रात** बँक म्हणून अधिसूचित केलेली इतर कोणतीही वित्तीय संस्था;

(ई) "सहकारी संस्था" म्हणजे, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदणी केलेली किंवा नोंदणी केल्याचे समजण्यात आलेली, आणि आपल्या सदस्यांना वित्तीय सहाय्य पुरवण्याचे उद्दिष्ट असलेली सहकारी संस्था; आणि तीत, सहकारी भू-विकास बँकेचा अंतर्भाव होतो; १९६१ चा महा. २४

(फ) "वित्तीय सहाय्य" म्हणजे, कोणत्याही कृषिविषयक प्रयोजनासाठी कर्ज, आगाऊ रक्कम, हमी किंवा अन्य रीतीने दिलेले किंवा कोणत्याही सहकारी कृषि संस्करण संस्थेचे भाग खरेदी करण्यासाठी दिलेले सहाय्य;

(ग) "विहित" म्हणजे, या अधिनियमाखालील नियमांद्वारे विहित;

१९६१ चा महा. २४ (ह) "निबंधक" म्हणजे, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये सहकारी संस्थांचे निबंधक म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती आणि तीत त्या अधिनियमाच्या कलम ३ अन्वये निबंधकाला सहाय्य करण्यासाठी नियुक्त केलेल्या कोणत्याही व्यक्तीचा अंतर्भाव होतो.

## प्रकरण दोन

### जमीन किंवा तीमधील हितसंबंध यांचे बँकांच्या नावे अन्य संक्रामण करण्याचे शेतकऱ्याचे अधिकार.

**३.** कोणतीही जमीन (किंवा तीमधील कोणतेही हितसंबंध) अन्य संक्रामित करण्याचा अधिकार निर्बंधित करणाऱ्या, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात किंवा कोणत्याही रूढीत किंवा परिपाठात काहीही असले तरी, कोणत्याही शेतकऱ्याने, जमिनीत त्याचा अधिकार असेल तेवढ्या प्रमाणात कोणतीही जमीन किंवा जमिनीत असेल असा त्याचा कोणताही अधिकार, हक्क आणि हितसंबंध यांचे, बँकेच्या नावाने, त्या बँकेकडून वित्तीय सहाय्य मिळवण्याच्या प्रयोजनासाठी (अशा जमिनीवर किंवा इतर कोणत्याही हितसंबंधावर भार निर्माण करून किंवा गहाणाद्वारे), अन्य संक्रामण करणे कायदेशीर असेल. अन्य संक्रामणावरील निर्बंध काढून टाकणे.

**४.** (१) अशा शेतकऱ्याने, मग तो, ज्या जमिनीतून पीक किंवा इतर माल काढला आहे त्या जमिनीचा मालक नसला तरीही, त्याच्या मालकीच्या जंगम मालमत्तेवर, किंवा त्याने कसलेल्या जमिनीत, पीक आणि त्याने काढलेल्या उभ्या किंवा अन्य पिकांवर किंवा इतर मालावर, त्याचा तीत हितसंबंध असेल तेवढ्या मर्यादेपर्यंत, बँकेच्या नावे, त्या बँकेकडून वित्तीय सहाय्य मिळविण्याकरिता, भार निर्माण करणे कायदेशीर असेल. पीक आणि इतर जंगम मालमत्ता यांवर बँकेच्या नावाने भार निर्माण करणे.

(२) बँकेकडून शेतकऱ्याला दिल्या जाणाऱ्या कोणत्याही वित्तीय सहाय्याबद्दल भार निर्माण करण्यात आला असेल त्याबाबतीत, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात तद्‌विरुद्ध काहीही असले तरी, त्याला बँकेकडून देण्यात आलेल्या कोणत्याही वित्तीय सहाय्याबाबतच्या, त्याने काढलेल्या, उभ्या किंवा अन्य पिकावर किंवा इतर कोणत्याही जंगम मालमत्तेवरील अशा भारावर, सहकारी संस्थेने पुरवलेल्या वित्तीय सहाय्याबाबतच्या कोणत्याही नंतरच्या भारास प्राथम्य असणार नाही.

(३) बँकेस, राज्य शासनाने, या बाबतीत पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्यामार्फत, बँकेस तिच्याकडे भारित केलेले पीक किंवा इतर माल किंवा कोणतीही जंगम मालमत्ता, शेतकऱ्याचा तीत हितसंबंध असेल त्या मर्यादेपर्यंत, अटकावून ठेवता येईल आणि विकता येईल आणि त्या शेतकऱ्याकडून बँकेला येणे असलेल्या सर्व रकमांबद्दल, अशा विक्रीचे उत्पन्न विनियोजित करता येईल.

**५.** (१) शेतकरी, त्याला बँकेकडून देण्यात आलेल्या कोणत्याही वित्तीय सहाय्याबाबत, त्याच्या मालकीच्या किंवा त्याचा हितसंबंध असणाऱ्या जमिनीवर किंवा इतर कोणत्याही स्थावर मालमत्तेवर भार निर्माण करील त्या बाबतीत, त्यास, अनुसूचीत दिलेल्या नमुन्यानुसार किंवा परिस्थितीनुसार शक्य असेल तेवढ्या प्रमाणात त्या नमुन्याशी मिळत्या जुळत्या नमुन्यात एक प्रतिज्ञापन करता येईल, आणि त्यात तो असे जाहीर करील की, बँकेने त्याला पुरविलेले वित्तीय सहाय्य मिळण्यासाठी तो, त्याद्वारे, अशा जमिनीवर किंवा त्यांच्या तीमधील हितसंबंधावर किंवा यथास्थिति, इतर स्थावर मालमत्तेवर, बँकेच्या नावे भार निर्माण करीत आहे. बँकेच्या नावे, प्रतिज्ञापत्राद्वारे, जमिनीवर भार निर्माण करणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये केलेल्या प्रतिज्ञापनात, शेतकऱ्यास, जिच्या नावे प्रतिज्ञापन करण्यात आले आहे त्या बँकेच्या संमतीने वेळोवेळी बदल करता येईल.

## प्रकरण तीन

### बँकांच्या नावे भार निर्माण करणे व गहाण ठेवणे आणि त्यांचे प्राथम्य

भार व गहाण निर्माण करण्यामधील असमर्थता दूर करणे.

६. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यामध्ये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात एतद्‌विरुद्ध काहीही असले तरी, आणि कोणतीही जमीन (किंवा तीमधील कोणताही हितसंबंध) आधीच सहकारी संस्थेकडे भारित किंवा गहाण असली तरी, शेतकऱ्यास, बँकेच्या नावे, त्या बँकेने शेतकऱ्यास दिलेल्या कोणत्याही वित्तीय सहाय्याबद्दल, तारण म्हणून, अशा जमिनीवर (किंवा तीमधील हितसंबंधावर) भार निर्माण करता येईल किंवा ती गहाण ठेवता येईल, परंतु त्यासंबंधीची पूर्वसूचना अशा शेतकऱ्याकडून आणि अशा बँकेकडून संबंधित सहकारी संस्थेला देण्यात आली पाहिजे. १९६१ चा महा. २४

बँकेच्या, शासनाच्या व सहकारी संस्थेच्या नावे असणाऱ्या भारांचे व गहाणांचे प्राथम्य.

७. (१) त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात तद्‌विरुद्ध काहीही असेल तरी,—

(अ) शेतकऱ्याने, त्याला बँकेकडून देण्यात आलेल्या वित्तीय सहाय्याबद्दल तारण म्हणून बँकेच्या नावे निर्माण केलेला कोणताही भार किंवा बँकेच्या नावे केलेले किंवा बँकेला दिलेले कोणतेही गहाण, हे या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, कालदृष्ट्या प्रथम असेल तर, त्याला शासनाच्या किंवा सहकारी संस्थेच्या नावे केलेल्या नंतरच्या कोणत्याही भारावर किंवा गहाणावर अग्रप्राथम्य राहील; आणि

(ब) बँकेकडून शेतकऱ्याला देण्यात आलेल्या वित्तीय सहाय्याबाबत कोणतीही जमीन (किंवा तीमधील हितसंबंध) यावर बँकेच्या नावे, निर्माण केलेला कोणताही भार किंवा त्या बँकेला दिलेले कोणतेही गहाण याला, शासन किंवा सहकारी संस्था किंवा इतर कोणतीही बँक यांच्याव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीच्या नावे अशी जमीन (किंवा तीमधील हितसंबंध) यावर निर्माण केलेला कोणताही इतर भार किंवा दिलेले गहाण यावर, असा भार किंवा असे गहाण, बँकेच्या नावे निर्माण केलेल्या भाराच्या किंवा दिलेल्या गहाणाच्या कालदृष्ट्या प्रथम असले तरीही, अग्रप्राथम्य राहील.

(२) एकाच जमिनीवर (किंवा तिच्यातील हितसंबंधावर) शासनाच्या, एका किंवा अधिक सहकारी संस्थांच्या किंवा एका किंवा अधिक बँकांच्या नावे, शेतकऱ्यांकडून निरनिराळे भार किंवा गहाण निर्माण करण्यात आले असतील त्याबाबतीत, विकासाच्या प्रयोजनांसाठी मुदती कर्जाच्या स्वरूपात शासनाकडून, सहकारी संस्थेकडून किंवा अशा बँकेकडून देण्यात आलेल्या वित्तीय सहाय्यासाठी तारण म्हणून निर्माण करण्यात आलेले असे कोणतेही भार किंवा ठेवण्यात आलेले गहाण यांना, शासनाच्या, सहकारी संस्थांच्या किंवा अशा बँकांच्या नावे निर्माण करण्यात आलेल्या इतर कोणत्याही भारावर किंवा ठेवण्यात आलेल्या गहाणावर अग्रक्रम असेल; परंतु मुदती कर्जाच्या स्वरूपात देण्यात आलेल्या अशा वित्तीय सहाय्याची नोटीस अशा शासनाला, सहकारी संस्थेला किंवा बँकेला देण्यात आली असली पाहिजे आणि अशा रीतीने देण्यात आलेल्या वित्तीय सहाय्याला त्या शासनाची, सहकारी संस्थेची किंवा बँकेची संमती असली पाहिजे; आणि मुदती कर्जाच्या स्वरूपात देण्यात आलेल्या वित्तीय सहाय्यासाठी तारण म्हणून अशा एका भारापेक्षा अधिक भार निर्माण करण्यात आले असतील किंवा अधिक गहाण ठेवण्यात आली असतील त्याबाबतीत, विकासाच्या प्रयोजनासाठी मुदती कर्जासाठी तारण म्हणून निर्माण करण्यात आलेल्या भारांना किंवा गहाणांना, त्याच्या निर्मितीच्या तारखांनुसार, परस्पर अग्रक्रम देण्यात येईल.

**स्पष्टीकरण :** या कलमाच्या प्रयोजनासाठी "विकास प्रयोजनासाठी मुदती कर्ज" म्हणजे शेतीच्या सुधारणेत किंवा शेतीतील मूर्त मत्तांच्या उभारणीत सर्वसाधारणपणे ज्यांची परिणती होईल असे वित्तीय सहाय्य; परंतु त्यामध्ये, खेळत्या भांडवलाचा खर्च, हंगामी कृषिविषयक कामे किंवा पिकांची खरेदी-विक्री यासाठी दिलेल्या वित्तीय सहाय्याचा समावेश होत नाही.

(३) या कलमातील कोणतीही गोष्ट. —

(एक) केवळ एका किंवा अधिक सहकारी संस्थांकडून घेतलेल्या कर्जांना, आणि

(दोन) जमीन महसुलाची थकबाकी म्हणून शासनाला देय असलेल्या रकमांच्या वसुलीला लागू होणार नाही.

१९०८ चा १६. — बँकेच्या नावे भाराची किंवा गहाणाची नोंदणी.

८. नोंदणी अधिनियम, १९०८ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्याच्या संबंधात कलम ५ च्या पोट-कलम (१) अन्वये प्रतिज्ञापन करण्यात आलेले आहे किंवा ज्याच्या संबंधात त्या कलमाच्या पोट-कलम (२) अन्वये बदल करण्यात आलेला आहे अशा भाराची किंवा बँकेच्या नावे शेतकऱ्याकडून करण्यात आलेल्या गहाणखताची नोंदणी करणे आवश्यक असणार नाही, आणि असा निर्माण करण्यात आलेला भार किंवा करण्यात आलेला बदल किंवा गहाणखत हे ते निर्माण करण्यात आल्याच्या किंवा करण्यात आल्याच्या तारखेपासून अंमलात येईल. परंतु, बँक विहित करण्यात येईल अशा वेळेच्या आत आणि विहित करण्यात येईल अशा रीतीने, ज्याद्वारे भार निर्माण करण्यात आला असेल, बदल किंवा गहाणखत करण्यात आले असेल अशा लेखाची एक प्रत, ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादामध्ये भार निर्माण केलेली किंवा गहाण ठेवलेली संपूर्ण मालमत्ता किंवा तिचा कोणताही भाग असेल त्या नोंदणी अधिकाऱ्याकडे पाठवील आणि असा नोंदणी अधिकारी, नोंदणी अधिनियम, १९०८ याच्या कलम ५१ अन्वये विहित करण्यात आलेल्या त्याच्या पुस्तक क्रमांक १ मध्ये ती प्रत किंवा यथास्थिती त्या प्रती दप्तरदाखल करील.

१९०८ चा १६. — बँकेच्या नावे निर्माण केलेल्या भाराची किंवा गहाणाची अधिकार अभिलेखात नोंद करणे.

९. बँकेकडून शेतकऱ्याला देण्यात आलेल्या वित्तीय सहाय्याच्या संबंधात, बँकेच्या नावे जमिनीवर (किंवा तिच्या हितसंबंधावर) भार निर्माण करण्यात आला असेल किंवा ती गहाण ठेवण्यात आली असेल तेव्हा ती बँक, तिच्या नावे निर्माण करण्यात आलेल्या भाराच्या किंवा गहाणाच्या तपशिलाची माहिती तलाठ्यास किंवा राज्य शासनाकडून या बाबतीत पदनिर्देशित करण्यात येईल अशा इतर महसूल अधिकाऱ्यास देईल. तलाठी किंवा इतर महसूल अधिकारी, ज्या जमिनीवर भार निर्माण करण्यात आला असेल किंवा जी गहाण ठेवण्यात आली असेल त्या जमिनीशी संबंधित अधिकार अभिलेखामध्ये भाराच्या किंवा गहाणाच्या तपशिलाची नोंद करील त्याचप्रमाणे, बँक, तिने शेतकऱ्याला दिलेल्या वित्तीय सहाय्यापैकी येणे रक्कम संपल्यानंतर लगेच तलाठ्याला किंवा इतर महसूल अधिकाऱ्याला तसे कळवील आणि त्यानंतर तो तलाठी किंवा इतर महसूल अधिकारी ती जमीन भारमुक्त किंवा यथास्थिती गहाणमुक्त झाल्याबद्दलची योग्य ती नोंद अधिकार अभिलेखात करील.

कर्जदार शेतकऱ्याकडून करण्यात येणाऱ्या कुळवहिवाट निर्मितीवर निर्बंध.

१०. (१) त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या शेतकऱ्याने जमिनीवर (किंवा तिच्यातील हितसंबंधावर) भार निर्माण करून किंवा ती गहाण ठेवून एखाद्या बँकेकडील वित्तीय सहाय्याचा स्वतः फायदा घेतला असेल त्या शेतकऱ्यास, अशा सहाय्याचा फायदा घेतल्यानंतर आणि असे सहाय्य थकित असण्याचे चालू असेल तोपर्यंत, त्या बँकेच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय, ती जमीन (किंवा तिच्यातील हितसंबंध) पट्ट्याने देता येणार नाही किंवा तिच्यावर कोणतेही कुळवहिवाटीचे अधिकार निर्माण करता येणार नाहीत किंवा त्या जमिनीच्या विक्रीबाबत कोणताही करार करता येणार नाही.

(२) या कलमाचे उल्लंघन करून देण्यात आलेला कोणताही पट्टा किंवा निर्माण करण्यात आलेले कोणतेही कुळवहिवाटीचे हक्क निरर्थक ठरतील.

## प्रकरण चार

### बँकांच्या देय रकमांच्या वसुलीची व्यवस्था

विहित प्राधिकाऱ्यामार्फत बँकांना देय असलेल्या रकमाची वसुली.

**११.** (१) या कलमाच्या प्रयोजनासाठी विहित प्राधिकारी म्हणून राज्य शासनाकडून पदनिर्देशित करण्यात आलेल्या अधिकाऱ्यास, बँकेने अर्ज केल्यानंतर, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, कोणत्याही शेतकऱ्यावर किंवा त्याच्या वारसावर किंवा कायदेशीर प्रतिनिधींवर असा आदेश बजावता येईल, की त्या शेतकऱ्याने घेतलेल्या वित्तीय सहाय्यामुळे बँकेला देय असलेली रक्कम, ज्या जमिनीवर असा भार निर्माण करण्यात आला असेल किंवा जी जमीन गहाण ठेवण्यात आली असेल अशा कोणत्याही जमिनीची (किंवा तिच्यातील हितसंबंधाची) विक्री करून भरावी;

परंतु उक्त शेतकरी किंवा त्या शेतकऱ्याचा वारसदार किंवा यथास्थिति, कायदेशीर प्रतिनिधी यांना देय रक्कम भरण्यास फर्माविणारी नोटीस विहित प्राधिकाऱ्याकडून त्यांच्यावर बजावण्यात आली नसेल तर, ज्या कोणत्याही जमिनीवर (किंवा तिच्यातील हितसंबंधावर) किंवा स्थावर मालमत्तेवर भार निर्माण करण्यात आला असेल किंवा ती गहाण टाकण्यात आली असेल अशा कोणत्याही जमिनीच्या (किंवा तिच्यातील हितसंबंधाच्या) किंवा इतर कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी, या कलमान्वये विहित प्राधिकाऱ्याने असा कोणताही आदेश काढता कामा नये.

(२) पोट-कलम (१) अन्वये विहित प्राधिकाऱ्याकडून काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, दिवाणी न्यायालयाचा हुकूमनामा असल्याचे समजण्यात येईल आणि अशा न्यायालयाच्या हुकूमनाम्याची ज्या रीतीने अंमलबजावणी करण्यात येते त्याच रीतीने त्याची अंमलबजावणी करण्यात आली पाहिजे.

(३) त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यानुसार इतर कोणत्याही रीतीने बँकेस आपले हक्क बजावण्यास या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, प्रतिरोध होणार नाही.

स्थावर मालमत्ता संपादन करण्याचे आणि तिचा विनियोग करण्याचे बँकेचे हक्क.

**१२.** (१) त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, शेतकऱ्याने घेतलेल्या वित्तीय सहाय्याच्या संबंधात शेतकऱ्याकडून बँकेच्या नावे भार निर्माण केलेली किंवा गहाण ठेवलेली शेतजमीन (किंवा तिच्यातील हितसंबंध) किंवा इतर कोणतीही स्थावर मालमत्ता संपादन करण्याचा अधिकार बँकेला असेल. परंतु, उक्त जमीन (किंवा तिच्यातील हितसंबंध) किंवा इतर कोणतीही स्थावर मालमत्ता जाहीर लिलावाद्वारे विकण्याचा प्रयत्न केला गेला असला पाहिजे आणि कोणत्याही व्यक्तीने बँकेला देय असलेला पैसा भरण्यास पुरेशी होईल अशा किंमतीत खरेदी करण्याची तयारी दाखविली असता कामा नये.

(२) पोट-कलम (१) अन्वये तिजकडे निहीत असलेल्या अधिकारानुसार जी बँक जमीन (किंवा तिच्यातील हितसंबंध) किंवा इतर कोणतीही स्थावर मालमत्ता संपादन करील त्या बँकेने, या बाबतीत राज्य शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीच्या आत विक्रीद्वारे त्या जमिनीचा किंवा मालमत्तेचा विनियोग केला पाहिजे.

(३) पोट-कलम (१) अन्वये बँकेने संपादन केलेली कोणतीही जमीन, पोट-कलम (२) मध्ये दर्शविल्याप्रमाणे तिची विक्री होईपर्यंत बँक पट्ट्याने देईल तर, पट्ट्याची मुदत एका वेळी एक वर्षापेक्षा अधिक असता कामा नये आणि त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात एतद्विरुद्ध कोणत्याही तरतुदी असल्या तरी, पट्टेदारास, ती मालमत्ता खरेदी करण्याचा कोणताही हक्क मिळणार नाही.

(४) या कलमान्वये जमिनीची (किंवा तिच्यातील हितसंबंधाची) बँकेने केलेली विक्री, अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या ज्या कोणत्याही तरतुदींमुळे, बिगर शेतकऱ्याने जमीन खरेदी करण्यावर, किंवा विशिष्ट जनजातीचा किंवा अनुसूचित जमातीचा नसेल अशा व्यक्तीने जमीन खरेदी करण्यावर जमीन (किंवा

तिच्यातील हितसंबंध) संपादन करण्यावरील कालमर्यादेवर, किंवा जमिनीचे तुकडे पाडण्यावर, निर्बंध पडत असतील, त्या तरतुदींच्या अधीन असेल.

**१३.** त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यातील, जमीन संपादन करण्यावर कमाल मर्यादा किंवा मर्यादा घालणारी कोणतीही गोष्ट, या अधिनियमान्वये जमीन संपादन करणाऱ्या आणि पूर्ववर्ती कलमान्वये तरतूद केलेल्या रीतीने किंवा अन्यथा बँकेला देय असलेल्या रकमांचा समावेश होईल अशा पर्याप्त किंमतीला ती जमीन ती बँक विकेल अशा वेळेपर्यंत अशी जमीन धारण करणाऱ्या बँकेस लागू होणार नाही. कमाल मर्यादेपेक्षा अधिक जमिनीच्या संपादनावरील निर्बंधापासून बँकांना सूट.

## प्रकरण पाच

### बँकांनी सहकारी संस्थांना भांडवल पुरविणे

१९६१ चा महा. २४. **१४.** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० किंवा त्या अधिनियमात व्याख्या केल्याप्रमाणे एखाद्या साधन संस्थेचे उप-विधी किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या बँकेने, एखाद्या सहकारी संस्थेचे सदस्य होणे कायदेशीर असेल. बँक सहकारी संस्थेची सदस्य होण्यास पात्र असणे.

**१५.** (१) ज्या सहकारी संस्थेने एक तर वित्तीय सहाय्यासाठी त्या बँकेकडे अर्ज केला असेल किंवा आधीच वित्तीय सहाय्य दिल्यामुळे ती संस्था त्या बँकेची ऋणी असेल अशा कोणत्याही सहकारी संस्थेच्या पुस्तकांची तपासणी करण्याचा अधिकार अशा बँकेस असेल. सहकारी संस्थेच्या पुस्तकांची बँकेकडून तपासणी.

(२) ही तपासणी एखाद्या अधिकाऱ्याकडून किंवा त्या बँकेच्या पगारी कर्मचारीवर्गाच्या इतर कोणत्याही सदस्याकडून निबंधकाच्या लेखी पूर्व परवानगीने पार पाडता येईल.

(३) अशी तपासणी करणाऱ्या बँकेच्या अधिकाऱ्यास किंवा बँकेच्या पगारी कर्मचारीवर्गाच्या इतर सदस्यास सर्व वाजवी वेळी, त्याच्याकडून तपासणी करण्यात येणाऱ्या सहकारी संस्थेच्या मालकीची किंवा तिच्या अभिरक्षेत असलेली लेखा पुस्तके, दस्तऐवज, रोखे, रोख रक्कम किंवा इतर मालमत्ता पहावयास मिळाली पाहिजे आणि संस्थेच्या आर्थिक परिस्थितीचा अंदाज करण्यासाठी आणि संस्थेला देण्यात यावयाच्या किंवा आधीच तिला देण्यात आलेल्या वित्तीय सहाय्याची सुरक्षितता पाहण्यासाठी त्याला हवी असेल अशी माहिती, निवेदन व विवरणेसुद्धा अशा संस्थेकडून त्याला पुरविण्यात आली पाहिजेत.

**१६.** (१) त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी एखाद्या सहकारी संस्थेला भांडवल पुरविणारी एखादी बँक आणि अशा रीतीने भांडवल पुरविण्यात आलेली सहकारी संस्था यांच्यामधील, सहकारी संस्थेची रचना, व्यवस्थापन किंवा कामकाज यांच्याशी संबंधित असलेला, पण संस्थेच्या एखाद्या पगारी कर्मचाऱ्याविरुद्ध संस्थेने किंवा तिच्या समितीने केलेल्या शिस्तभंगाच्या कार्यवाही-संबंधातील विवादाव्यतिरिक्त असलेलला कोणताही विवाद, विवादातील कोणत्याही पक्षकाराकडून निर्णयार्थ निबंधकाकडे निर्देशित करण्यात येईल. बँक आणि सहकारी संस्था यांच्यामधील विवाद.

(२) पूर्वगामी पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी, निर्णयार्थ निर्देशित केलेली बाब विवाद आहे किंवा नाही याबाबत कोणताही प्रश्न निर्माण होईल त्याबाबतीत त्या प्रश्नाचा निबंधकाकडून निर्णय करण्यात आला पाहिजे आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.

१९६१ चा महा. २४. **१७.** निबंधकाकडे निर्देशित करण्यात आलेली किंवा त्याच्या निदर्शनास आणण्यात आलेली कोणतीही बाब पूर्ववर्ती कलमाच्या अर्थानुसार विवाद आहे अशी निबंधकाची खात्री होईल तर, निबंधक स्वतः त्या विवादाचा निर्णय करील किंवा तो विवाद त्याने नेमलेल्या नामनिर्देशित व्यक्तीकडे किंवा नामनिर्देशित व्यक्तींच्या मंडळाकडे विवादांचा निर्णय.

किंवा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये अशा विवादाचा निर्णय करण्यासाठी सक्षम असलेल्या इतर कोणत्याही प्राधिकाऱ्याकडे, निकालात काढण्यासाठी निर्देशित करील आणि त्यानंतर विवादाचा निर्णय करणे, अपिले आणि अशा कार्यवाह्यांमधील निर्णयाची, निवाड्यांची किंवा आदेशांची अंमलबजावणी यांसारख्या विवादांशी संबंधित असलेल्या त्या अधिनियमाच्या सर्व तरतुदी, योग्य त्या फेरफारासह, असा विवाद त्या अधिनियमाच्या अर्थानुसार आणि त्या अधिनियमान्वये विवाद असल्याप्रमाणे लागू होतील.

निवाडा देण्यात आलेल्या पैशाची वसुली.

**१८.** पूर्ववर्ती कलमान्वये एखाद्या बँकेला देय असल्याचे आढळून आलेल्या कोणत्याही रकमेच्या वसुलीस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० याच्या कलम १५६ च्या तरतुदी आणि तदन्वये करण्यात आलेले नियम लागू होतील. १९६१ चा महा. २४.

सहकारी संस्थांच्या कसूरदार सदस्यांविरुद्ध कार्यवाही करण्याचे बँकेचे अधिकार.

**१९.** (१) एखाद्या सहकारी संस्थेच्या सदस्यांनी त्यांच्याकडून देय असलेली रक्कम देण्यात कसूर केल्याच्या कारणावरून, सहकारी संस्था, तिने ज्या बँकेकडून कर्जे घेतली असतील त्या बँकेस कर्जांची रक्कम परत करण्यास असमर्थ असेल तर, अशा सदस्यांविरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यामध्ये तरतूद केल्याप्रमाणे सर्व कारवाई करण्यासाठी बँकेस, अशा संस्थेच्या समितीस निदेश देता येईल. १९६१ चा महा. २४.

(२) बँकेकडून असा निदेश मिळाल्याच्या तारखेपासून नव्वद दिवसांच्या आत कसूरदार सदस्यांविरुद्ध कार्यवाही करण्यात सहकारी संस्थेच्या समितीने कसूर केल्यास, बँकेस स्वतःलाच निबंधकास खबर देऊन, अशा कसूरदार सदस्यांविरुद्ध कार्यवाही करता येईल आणि अशा प्रसंगी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० याच्या तरतुदी आणि तदन्वये केलेले नियम व उपविधी हे, उक्त तरतुदींमधील, नियमांतील आणि उपविधींतील संस्थेसंबंधीचे किंवा तिच्या समितीसंबंधीचे सर्व निर्देश हे बँकेसंबंधीचे निर्देश होते असे समजून, लागू होतील.

(३) एखाद्या बँकेने, तिच्या ऋणी सहकारी संस्थेविरुद्ध हुकूमनामा किंवा निवाडा मिळवला असेल त्या बाबतीत, बँकेस असा पैसा प्रथमतः सहकारी संस्थेच्या मत्तेमधून आणि नंतर सहकारी संस्थेच्या सदस्यांकडून, त्यांनी संस्थेस देय असलेल्या कर्जाच्या मर्यादेपर्यंत वसूल करण्यासाठी कार्यवाही करता येईल. १९६१ चा महा. २४.

संस्थेची लेखा परीक्षा, चौकशी आणि तपासणी अहवाल बँकांना उपलब्ध असणे.

**२०.** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० याअन्वये केलेल्या प्रत्येक लेखा परीक्षेत किंवा चौकशीत किंवा तपासणीत नजरेस आलेल्या दोषांकडे निबंधकाने सहकारी संस्थेला पैसा पुरविणाऱ्या बँकेचे लक्ष वेधले पाहिजे आणि बँकेने लेखी मागणी केल्यास, तिला अशा प्रत्येक लेखा परीक्षा, चौकशी किंवा तपासणी अहवालाची प्रतही पुरविली पाहिजे. १९६१ चा महा. २४.

## प्रकरण सहा

### किरकोळ

सावकारी आणि शेतीविषयक कर्जबाजारीपणामध्ये सहाय्य यासंबंधीच्या कायद्यांपासून सूट.

**२१.** मुंबई सावकार अधिनियम, १९४६ किंवा सावकारी आणि सावकार यासंबंधीचा इतर कोणताही कायदा यामधील किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या शेतीविषयक कर्जबाजारीपणामध्ये सहाय्य देण्यासंबंधीच्या कायद्यामधील कोणताही मजकूर बँकेकडून शेतकऱ्याने घेतलेल्या वित्तीय सहाय्यास लागू होणार नाही. १९४७ चा मुंबई ३१.

**२२.** (१) त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, अविभक्त हिंदू कुटुंबाच्या व्यवस्थापकाने वित्तीय सहाय्यासाठी बँकेच्या नावे करून दिलेले गहाणखत हे, अशा अविभक्त हिंदू कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीवर बंधनकारक राहील. अविभक्त हिंदु कुटुंबाच्या व्यवस्थापकांनी करून दिलेले गहाणखत.

(२) बँकेच्या नावे करून दिलेले गहाणखत हे त्या कुटुंबातील व्यक्तींवर (मग अशा व्यक्ती सज्ञान असोत वा नसोत) बंधनकारक नसलेल्या कारणांसाठी अविभक्त हिंदू कुटुंबांच्या व्यवस्थापकाने करून दिले होते असा आक्षेप घेण्यात आला असेल त्या बाबतीत, ते सिद्ध करण्याची जबाबदारी तसे अभिकथन करणाऱ्या पक्षकारावर राहील.

**२३.** हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम, १९५६ याचे कलम ८ हे, त्यातील न्यायालयासंबंधीचा निर्देश हा जिल्हाधिकाऱ्यासंबंधीचा किंवा त्याच्या द्वारे नामनिर्देशित व्यक्तीसंबंधीचा निर्देश असून जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा त्याच्या द्वारे नामनिर्देशित व्यक्तीच्या आदेशाविरुद्ध आयुक्ताकडे अपील करण्यात येईल असा अर्थ लावून बँकेच्या नावे करून देण्यात आलेल्या गहाणखतास लागू होईल. सन १९५६ चा अधिनियम बत्तीस याचे कलम ८, त्यात फेरबदल करून लागू करणे.

१९०९ चा तीन, १९२० चा पाच. **२४.** इलाखा-शहर नादारी अधिनियम, १९०९ किंवा प्रांतिक नादारी अधिनियम, १९२० किंवा त्यावेळी अंमलात असलेला इतर कोणताही तत्सम कायदा यात काहीही अंतर्भूत असले तरी बँकेच्या नावे करून देण्यात आलेले गहाणखत हे किंमती मोबदल्यासाठी सद्भावनेने करून देण्यात आले नव्हते या कारणावरून किंवा गहाणकाराच्या इतर धनकोंमध्ये बँकेला प्राथम्य देण्यासाठी ते करून देण्यात आले होते या कारणावरून कोणत्याही नादारीविषयक कार्यवाहीत त्यावर आक्षेप घेण्यात येणार नाही. गहाणकारांच्या नादारीनंतर गहाणखतावर आक्षेप घेण्यात येणार नाही.

**२५.** (१) या अधिनियमाखालील नियम करण्याच्या अधिकाराचा वापर, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, राज्य शासनाकडून करण्यात येईल आणि तो पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असेल. राज्य शासनाचा नियम करण्याचा अधिकार.

(२) या अधिनियमात इतरत्र अंतर्भूत असलेल्या नियम करण्याच्या कोणत्याही अधिकारास बाध येऊ न देता, राज्य शासनास, सामान्यतः या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, या अधिनियमाशी सुसंगत असे नियम करता येतील.

(३) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम हा, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे संमत होतील, आणि **शासकीय राजपत्रात** असा निर्णय अधिसूचित केला असेल, तर तो नियम अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून, केवळ अशा सुधारलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा यथास्थिति अंमलात येणार नाही, तथापि, असा कोणताही फेरफार किंवा रद्द करणे यांमुळे, उक्त नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

## अनुसूची

### कलम ५, पोट-कलम (१) खालील प्रतिज्ञापन

मी, ................................................ (वय वर्षे ............... ) राहणार .................... .............................................. बँकेकडून वित्त सहाय्य घेऊ इच्छित असल्यामुळे, महाराष्ट्र बँकांकडून कृषिविषयक कर्जाच्या सोयीची तरतूद करण्याबाबत अधिनियम, १९७४ याचे कलम ५ (१) या अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे मी, ................................ हे घोषित करीत आहे की, खाली, विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रातील जमीन माझ्या मालकीची आहे / जमिनीत माझा कूळ म्हणून हितसंबंध आहे आणि मी, याद्वारे, बँक देऊ शकेल असे वित्तीय सहाय्य मिळवण्यासाठी आणि बँक भावी काळात देऊ शकेल असे कोणतेही सहाय्य असल्यास ते मिळविण्यासाठी त्यावरील व्याज व खर्च यांसह, बँकेच्या नावे उक्त जमिनीवर / उक्त जमिनीतील हितसंबंधावर भार निर्माण करीत आहे.

| गावाचे नाव | तालुक्याचे नाव | जिल्ह्याचे नाव | भूमापन क्रमांक / शहर भूमापन क्रमांक | | सीमा | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | भूखंड क्रमांक | पोट-हिस्सा क्रमांक | दक्षिण-पूर्व | उत्तर-पश्चिम |
| | | | | | | |

| क्षेत्र | आकारणी | | अंदाजे मूल्य | भार असल्यास तो भार | | शेरा असल्यास तो शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| हेक्टर | रुपये | पैसे | | स्वरूप | केव्हा निर्माण केला | रक्कम |
| | | | | | | |

या गोष्टीच्या साक्षीदाखल मी, .............................................. याखाली दिनांक ................... एकोणीसशे ............................ रोजी आपली सही करीत आहे.

साक्षीदार .......................................

उपरिनामित व्यक्तीने खालील व्यक्तींच्या समक्ष स्वाक्षरी करून स्वाधीन केले :

१. ....................................................

२. ....................................................

.............................................. यांनी साक्षांकित केले.

**प्रतिज्ञापन करणाऱ्याची सही.**

प्रतिज्ञापना अन्वये निर्माण केलेल्या ............................................. भाराचा तपशील अधिकाराभिलेखात समाविष्ट करण्यात यावा आणि बँकेच्या अभिलेखासाठी प्रतिज्ञापन परत करण्यात यावे, या विनंतीसह तलाठी किंवा इतर पदनिर्देशित महसूल अधिकारी यांच्याकडे रवाना.

व्यवस्थापक / एजंट,
............................... बँक.

तारीख ............................................

ठिकाण ..........................................

व्यवस्थापक / एजंट, ..................................................................... बँक, यांस परत. प्रतिज्ञापना अन्वये निर्माण करण्यात आलेल्या भाराचा तपशील दिनांक ...................................... १९ रोजी अधिकाराभिलेखात यथोचितरीत्या समाविष्ट केला आहे.

तारीख ..............................................

तलाठी किंवा इतर पदनिर्देशित महसूल अधिकारी.

प्रतिज्ञापना अन्वये निर्माण करण्यात आलेल्या .................................................. भाराचा तपशील उपनिबंधकांच्या कार्यालयात नोंदण्यात यावा, या विनंतीसह उपनिबंधकांकडे रवाना.

व्यवस्थापक / एजंट,
......................................... बँक.

व्यवस्थापक / एजंट ................................................ बँक, यास परत. प्रतिज्ञापना अन्वये निर्माण करण्यात आलेला भार यथोचित रीत्या नोंदण्यात आला आहे.

तारीख ...............................

उप-निबंधक

शा. मु. वाई—७,०००—३-२०१२—एच-२१५*

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  मुद्रण लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  **महाराष्ट्र राज्य**
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई - ४०० ००४.

- **पर्यवेक्षक**
  **शासकीय ग्रंथागार**
  (केंद्र शासनाच्या व महाराष्ट्र राज्य शासनाच्या प्रकाशनाकरिता)
  (फक्त स्थानिक विक्रीकरिता)
  युसुफ बिल्डिंग, दुसरा मजला, खो. नं. २१,
  वीर नरीमन रोड (हुतात्मा चौकाजवळ),
  मुंबई-४०० ००१

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार,
  जी. पी. ओ. नजिक, पुणे - ४११ ००१.

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
  सिव्हील लाईन्स, नागपूर - ४४० ००१.

- **पर्यवेक्षक**
  शासकीय ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ,
  औरंगाबाद - ४३१ ००१.

आणि

**महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**